स्थायी समितीच्या **गुरुवार दिनांक 17–12–2015** रोजी **सायंकाळी 05–00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिति सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| **1.** | **मा. श्री. रमेश माणिकराव सिंगारे** | **सभापती** |
| 2. | मा. श्री. संजयकुमार कृष्णराव बालपांडे | सदस्य |
| 3. | मा. श्री. श्रावण तुकाराम खापेकर | सदस्य |
| 4. | मा. श्री. जगतराम सेवकराम सिन्हा | सदस्य |
| 5. | मा. श्री. मो. कामील अंसारी | सदस्य |
| 6. | मा. श्री. किशोर चिंधुजी गजभिये | सदस्य |
| 7. | मा. सौ. निता राजेंद्र ठाकरे | सदस्या |
| 8. | मा. श्री. किशोर रामाजी डोरले | सदस्य |
| 9. | मा. सौ. कांता राधेश्याम रारोकर | सदस्या |
| 10. | मा. सौ. सरस्वती विजय सलामे | सदस्या |
| 11. | मा. श्री. संदिप प्रल्हाद सहारे | सदस्य |
| 12. | मा. श्री. दिपक मोहन पटेल | सदस्य |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. श्री. शरद महादेवराव बांते | सदस्य |
| 2. | मा. श्री. गोपीचंद कृष्णराव कुमरे | सदस्य |
| 3. | मा. सौ. विशाखा विकास मैंद | सदस्या |
| 4. | मा. श्रीमती प्रेरणा बळीराम कापसे | सदस्या |

## उपस्थित अधिकारी

1. श्री. आर.झेड. सिद्दीकी, अति. आयुक्त
2. श्री. जयंत दांडेगावकर, अति. उपायुक्त

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

ठराव क्रमांक 318:— स्थायी समिति ठराव क्र. 177 दि. 12.11.2012 अनुसार नविन प्रशासकीय इमारतीच्या बांधकामाचे मुळ प्राकलन रूपये 17,99,45,258.00 मध्ये वाढ होवून सुधारीत प्राकलन रूपये 56,34,15,055.00 यास मंजूरी प्रदान करण्यात आलेली आहे. या प्रकल्पाचे वास्तुशिल्पकार श्री. विरेंद्र खरे यांना या आधिच मंजूर 3 टक्के सेवा शुल्क अदा करण्यासाठी व सेवा घेण्याचा प्रश्न विचारात घेवून मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून नविन प्रशासकीय इमारतीचे जून 2013 पर्यंत

संपूर्ण काम करून घेण्याची जबाबदारी पी.एम.सी. ची राहील या अटीवर समितीने मंजूरी प्रदान केलेली होती. परंतु खालिल नमुद बाबींमुळे काम पूर्ण होवु शकले नाही.

- नविन प्रशासकिय इमारतीचे इंटेरीअर वर्क व सिव्हिल चे काम रूपये 6,62,99,840.00 (5.6 % कमी दरावर) मे. वुडफन यांना काम देण्यात आले होते. कंत्राटदाराने फक्त तळमजल्याचे व इतर माळयाचे अर्धवट कामे दिनांक 11.04. 2013 पर्यंत रूपये 1,14,72,357.00 करण्यात आली.
- कंत्राटदार मे. वुडफन अकार्यक्षम असल्याने पुर्ण काम करू शकला नाही त्यामुळे मा. स्थायी समिती मंजुर ठराव क्रमांक 67 दिनांक 14.07.2014 अन्वये मे. वुडफन मुंबई यांना देण्यात आलेला एकत्र इंटेरीअर व सिव्हिल वर्क (ग्राउंड + सात माळे) कामाचा कंत्राट रदद करण्यात आलेला असुन उर्वरीत कामे विभागाने गरजेनुसार, पुनः निविदा काढुन पूर्ण करण्याचे निर्देश दिलेले आहे.
- सुधारीत नियमानुसार फायर एस्केप स्टअरकेसचे अतिरीक्त काम करणे अनिवार्य असल्याने स्वतंत्र निविदा काढुन काम पूर्ण करण्यास वेळ लागला.
- त्याचकाळात मनपाचा ऑक्ट्राय रदद होवुन एल.बी.टी. लागु झाल्याने मनपाच्या आर्थिक उत्पानात घट झाली, त्यामुळे कंत्राटदाराचे/आर्किटेक्ट चे देयके देण्यास विलंब झाले. त्यामुळे पुढील कामाकरीता आवश्यक तो सहयोग मिळाला नाही.
- त्याअनुषंगाने अमलबजावणी करण्यात येत असुन प्रथम टप्पात पहिल्या व दुसऱ्या माळयाचे निविदा काढुन कंत्राटदार मे. एस. एस. पाटील यांना देण्यात आलेला आहे व काम प्रगतीत सुरू आहे. उर्वरीत मजल्याचे व प्रकल्पातील ईतर कामे आवश्यकतेनुसार निविदा काढुन काम करण्याचे नियोजीत आहे. याकरीता मुळ आर्किटेक्ट श्री. विरेंन्द्र खरे यांची सेवा घेणे सुरू आहे व पुढेही आवश्यक आहे.
- नविन प्रशासकिय इमारतीच्या प्रकल्पाला एकुण रूपये 56,34,15,055.00 ची प्रशासकिय मान्यता प्राप्त असली तरी यामध्ये अंर्तभुत कामे टप्या टप्याने पूर्ण करावी लागणार आहे. कामांचा आवश्यकता व निकडीनुसार कामे हाती घेण्यात येईल व पूर्ण करण्यात येईल.

सबब, नमूद केलेल्या सर्व परिस्थीतीचा विचार करता मुळ आर्किटेक्ट श्री. विरेंद्र खरे यांना जुन्याच मंजूर दरावर 3 टक्के सेवाशुल्क प्रशासकीय इमारत प्रकल्पामध्ये अंतर्भुत असलेले संपूर्ण कामे पूर्ण होईस्तव, मुदतवाढ देण्याची शिफारस आहे. त्याचप्रमाणे आर्किटेक्ट श्री. विरेंद्र खरे यांनी खालिल नमुद बाबींची पूर्तता करणे बंधनकारक राहील.

1. आर्किटेक्ट श्री. विरेंद्र खरे यांना त्यांचे किमान एक अनुभवी अभियंता/आर्किटेक्ट कायमस्वरूपी तात्काळ सेवा व अडचणी दुर करण्याकरीता साईटवर असणे आवश्यक.
2. साईटनुसार कामामध्ये केलेल्या बदलाची व मौखीक सुचनांची नोंद घेवुन व त्यानुसार नकाशामध्ये दुरूस्ती करून कंत्राटदाराला सुधारीत नकाशे देणे आवश्यक.
3. उर्वरीत प्राकलने विभागाच्या गरजेनुसार तयार करून वेळेत सादर करणे आवश्यक.
4. प्रकल्पामधील अंर्तभुत असलेल्या कामांचे Construction management plan सादर करतील

जेणेकरून प्रकल्पाची पूर्ण रूपरेषा व कामाचा प्राधान्य क्रम व लागणारा वेळ निश्चित करण्यास मदत होईल.

उपरोक्त प्रस्ताव मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 319</u>:— प्रभाग क्र. 67 अ येथे जयवंत नगर (ख.क्र. 90,92) व बेघर मित्र गृह नि.संस्था (ख.क्र. 68/1,2) येथील भागातील रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे कामास्तव रु. 30,73,995/— रक्कमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 320</u>:— प्रभाग क्र. 71 त्रिमुर्ती नगर येथील एम.आय.जी कॉलोनी येथील रस्त्यांचे रूंदीकरण व डांबरीकरण करण्याचे कामास्तव विभागाद्वारे तयार करण्यात आलेल्या रू. 41,20,049/— (अक्षरी एक्केचाळीस लक्ष विस हजार एकोण पन्नास रूपये) रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करून निविदा काढण्याचा व या आर्थिक वर्षात पद क्र. 681 (A22001330802) अंतर्गत तरतूद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 321</u>:— प्रभाग क्र. 13—अ व ब येथील संजय गांधीनगर, सुजाता नगर, जोशीपुरा, सोनारटोली रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. प्रेमचंद राचुमल यांची मूळ प्राकलनीय दरांपेक्षा 3.97 प्रतिशत अधिक दराची रु. 31,18,413/— (अक्षरी एकतीस लक्ष अठरा हजार चारशे तेरा फक्त) दराची निविदा मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 322</u>:— प्रभाग क्र. 14— ब कुंदनलाल गुप्ता नगर व इतर ठिकाणी सी.सी. पेव्हमेंटचे तसेच नामदेव नगर येथे डांबरीकरण रस्त्याचे काम करण्याच्या कामास्तव रू. 70,00,000/— (अक्षरी अक्षरी सत्तर लक्ष फक्त) प्राकलनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 323</u>:— प्रभाग क्र. 69, 70 व 72 मधील स्वालंबीनगर, जीवन छाया ले—आऊट, प्रोसेस सर्वेयर कॉलोनी, सरस्वती ले—आऊट, श्रीनगर येथील विविध ठिकाणी रस्त्यांचे डांबरीकरण करण्याचे कामास्तव विभागाद्वारे तयार करण्यात आलेल्या रु. 30,00,000/— (अक्षरी तीस लक्ष रुपये) रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करुन निविदा काढण्याचा व या आर्थिक वर्षा पद क्र. A22001330802 (681) अंतर्गत तरतूद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 324</u>:— प्रभाग क्र. 57 अ+ब मधील कुकडे ले—आऊट सुंदरबन व सुयोगनगर येथील रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरण करण्याचे कामास्तव विभागाद्वारे तयार करण्यात आलेल्या रू. 29,99,616/— रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करुन निविदा काढण्याचा व या आर्थिक वर्षात पद क्र. (682) A22001330803 अंतर्गत तरतूद मुक्ता करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 325</u>:— प्रभाग क्र. 21 अ व ब मधील जायका मोटर ते एस.टी. उरसुला शाळे पर्यंत डांबरीकरण करणे व गड्डीगोदाम येथे मस्जिद जवळील भागात सी.सी.रस्ते तयार करण्याच्या कामास्तव रु. 29,99,318/— (अक्षरी एकोणतीस लक्ष नव्यांनऊ हजार तीनशे अठरा फक्त) प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 326</u>:— प्रभाग क्र. 54 अ व ब येथील अभ्यंकरनगर व सेवानगर येथील रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करण्याच्या रु. 29,98,795/— (अक्षरी एकोणतीस लक्ष अठ्ठयानऊ हजार सातशे पच्यान्नव फक्त) प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 327</u>:— प्रभाग क्र. 52—अ धरमपेठ व शंकरनगर येथे रस्त्याचे येथे रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरण करण्याच्या कामास्तव रु. 49,99,417/— (अक्षरी एकोनपन्नास लक्ष नव्यांनऊ हजार चारशे सतरा फक्त) प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 328</u>:— प्रभाग क्र. 14 अ व ब कुंदनलाल गुप्ता नगर येथे विविध ठिकाणी सी.सी.रोडचे कार्य व पंचवटी नगर नामदेव नगर येथे रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. एल. सी.गुरुबक्षाणी यांची मूळ प्राकलनीय दरांपेक्षा 3.15 प्रतिशत अधिक दराची रु. 30,93,633/— (अक्षरी तीस लक्ष त्र्यांनऊ हजार सहाशे तेहतीस फक्त) दराची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 329:— प्रभाग क्र. 44—अ, येथे के.डी.के.इंजिनिअरींग कॉलेज मागील नागनदीच्या भिंतीचे बांधकाम करण्याचे कामास्तव रू. 49,76,781/— रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करणे तसेच पद क्र. A43901370812 अंतर्गत या कामास्तव तरतूद उपलब्ध करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 330:— स्थानिक संस्था कर विभागातील विविध जकात नाक्यांवरील भंगार सामानाची विल्हेवाट लावण्याबाबत.

1 एप्रिल, 2013 पासून स्थानिक संस्था कर प्रणाली सुरु झाल्यानंतर व्यावसायिकांद्वारे शहरात आयात होत असलेल्या मालावर स्थानिक संस्था कर भरल्या जातो किंवा किती याची पडताळणी करण्याकरिता मुख्य जकात नाक्यांवर आयात होत असलेल्या वाहनातील मालाच्या कागदपत्रांचे स्कॅनिंग करण्याचे काम सुरु होते. परंतु शासन अधिसूचने नुसार 1 ऑगष्ट, 2015 पासून 50 कोटीच्या वर वार्षिक उलाढाल असलेल्या व्यावसायिकांकरिता स्थानिक संस्था कर लागू असल्याने जकात नाके पूर्णतः बंद करण्यात आले असून या जकात नाक्यांवर असलेले भंगार साहित्य जसे लोखंडी आलमाऱ्या, तुटलेल्या खुर्च्या, कुलर्स, लोखंडी ॲंगल्स, टेबल, पिण्याचे पाण्याचे मशिन्स इ. जमा करुन जकात नाका नं. 10 वाडी येथील गोडाऊन मध्ये ठेवण्यात आलेले आहे. या भंगार सामानाची विल्हेवाट लावण्याचे दृष्टीने पंजिकृत व्हॅल्युअर मे. चांडक यांचेकडून अंदाजित मूल्यांकन करुन घेण्यात आलेले आहे. या भंगार सामानाची निविदा मागवून विल्हेवाट लावण्यास्तव रितसर प्रक्रिया पार पाडून कार्यवाही करण्याच्या प्रस्तावास मा. स्थायी समितीची मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 331:— प्रभाग क्र. 23—मधील फ्रेन्डस् कॉलोनी येथिल घाटातील उर्वरीत स्थापत्य काम करण्याकरीता रु. 29,99,544/— (अक्षरी एकोनतीस लक्ष नव्यानउ हाजर पाचशे चौळेचाळीस फक्त) रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करणे तसेच जुने पद क्रमांक 602 व नविन पद क्र. A43501271705 अंतर्गत या कामास्तव तरतूद उपलब्ध करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 332:— प्रभाग क्र. 10 मधील नई वस्ती व ख्रिश्चन कॉलनी भागातील रस्त्याचे डांबरीकरण करण्यास्तव रु. 29,97,142/— (अक्षरी एकोणतीस लक्ष सत्यान्नऊ हजार एकशे बेचाळीस फक्त)

प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 333:— प्रभाग क्र. 7 अ, ब ताजनगर, संत ज्ञानेश्वर सोसायटी ले आऊट, बन्धु नगर, मलवार ले आऊट झिंगाबाई टाकळी येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्यास्तव रु. 29,93,132/— (अक्षरी एकोणतीस लक्ष त्र्यानऊ हजार एकशे बत्तीस फक्त) प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 334:— नेहरूनगर झोन क्र. 5 साठी टिप्पर खरेदी करण्यासाठी प्रभाग समितीचे दि. 10.08.2015 चे ठराव क्र. 5 अन्वये पद क्र. A42025170553 (रस्त्याची सुधारणा व निर्माण –फुटपाथ अंतर्भुत) मधुन रूपये 14.00 लक्ष मुख्यालयातील पद क्र. A4301171602 (मशीनरी खरेदी) वळते करण्यास मंजुरी प्रदान केलेली आहे. सदर विनियोजनास स्थायी समितीची मंजुरी आवश्यक असल्याने सदर प्रस्तावास मान्यता देण्याचा प्रश्न विचारात घेऊन तसेच सदर विनियोजन एका प्रधान शिर्षातुन दुसऱ्या प्रधान शिर्षात असल्याने यास मनपाचे सर्वसाधारण सभेची मंजुरी आवश्यक असल्याने पुढील मंजुरीकरीता मा. सभागृहाकडे पाठविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 335:— झोन क्र. 5 अंतर्गत प्रभाग क्र. 44 (अ) मधील कवेलु क्वार्टर, दर्शन कॉलनी, एम.आय.जी. कॉलोनी, हसनबाग व नंदनवन झोपडपट्टी येथे 6/9 मी. खांब व 70/150 वॅट सो.व्हे. फिटींग लावून प्रकाश व्यवस्था करण्याकरिता रु. 30,18,400/— च्या प्राकलनास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 336:— प्रभाग क्र. 61 दिघोरी दहनघाट येथे विविध विकासाचे कामे करण्यास्तव रु. 29,11,254/— रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करणे तसेच पद क्र. A23501130807 अंतर्गत या कामास्तव तरतूद उपलब्ध करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 337</u>:— प्रभाग क्र. 42 ब किल्ला येथे जुना पुस्तक बाजार ते संघ बिल्डिंग चौक व शिवराज डेकोरेशन ते किल्ला रोड पर्यंत सिमेंट काँक्रीट रोडचे बांधकाम करण्याचे कामास्तव तयार केलेल्या रूपये 55,13,920/— (रूपये पंचावण्ण लक्ष तेरा हजार नऊशे वीस फक्त) रकमेच्या प्राकलनास जुने पद क्रमांक 681 व नविन पद क्रमांक A22001330802 अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याच्या तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 338</u>:— झोन क्र. 5 अंतर्गत प्रभाग क्र. 46 (ब) मधील धन्वंतरी नगर, क्वार्टर, रमणा मारोती नगर, न्यू नंदनवान, गुरुदेव नगर, ईश्वर नगर व कामगार नगर येथे 6/9 मी. खांब व 70/150 वॅट सो.व्हे. फिटींग लावून प्रकाश व्यवस्था करण्याकरिता रु. 32,70,400/— च्या प्राकलनास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 339</u>:— प्रभाग क्र. 22 अ मधील सदर व गिट्टीखदान भागाचे रोडचे डांबरीकरण करण्याकरीता रूपये 29,99,343/— (रूपये एकोणतीस लक्ष नव्यानऊ हजार तिनशे त्रेचाळीस रूपये फक्त) प्राकलनास जुने पद क्रमांक 681 व नविन पद क्रमांक A22001330802 अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याच्या तसेच हे काम रितसन निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 340</u>:— प्रभाग क्र. 67 ब येथील जयदुर्गा टाईल्स ते गुरूदेव नगर पर्यंत रस्त्याचे रूंदीकरण व डांबरीकरण करण्याचे कामासतव रू. 34,35,932/— रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 341</u>:— नागपूर शहर मंजूर विकास योजने नुसार EP 68 मौजा सिताबर्डी येथील मॉरेस कॉलेज टी पाईंट ते नागपूर विद्यापीठ पर्यंत 18 मिटर रुंदीचा रस्ता विकसित करण्याकरिता जुना संरक्षण भिंत तोडून नवीन संरक्षण भिंत बांण्याच्या कामास्त, प्राप्त निम्नतम निविदा मे. राजेश कंस्ट्रक्शन यांची मूह प्राकलनीय दरापेक्ष 15.15 टक्के कमीची रु. 51,72,492/— (रुपये एक्कावण लक्ष बाहत्तर हजार ब्यानऊ) (A2001370406) अंतर्गत प्रस्तावित असून या कामाकरिता रु. 60,96,043/—

राशीची तरतूद करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 342</u>:— प्रभाग क्र. 27 अंतर्गत सरदार पटेल चौक ते मोक्षधाम घाटाकडे जाणाऱ्या नागनदीच्या पूर्नबांधाणीच्या कामास्तव रूपये 5,33,05,284/— (रूपये पाच करोड तेहत्तीस लक्ष पाच हजार दोनशे चौऱ्यांशी रूपये फक्त) ची निविदा काढली होती. प्राप्त निविदापैकी मे. अबरार अहमद हयांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा 7.86 टक्के (सन 2013—2014 चे दर सुचीप्रमाणे) अधिक दराची निविदा रूपये 5,74,95,079/— (रूपये पाच करोड चौऱ्यात्तर लक्ष पंच्यानऊ हजार एकोणअंशी रूपये फक्त) झाली. मा. निगम आयुक्त यांनी हयाबाबत "हया आर्थिक वर्षात जितका खर्च होईल तेवढीच Provision Release करून मान्य करण्यास हरकत नाही " असे सुचविले. हयाबाबत विभागाचे मतानुसार हया आर्थीक वर्षात साधारण अंदाजे रूपये 3,00,00,000/— (रूपये तिन करोड फक्त) खर्च होऊ शकतो. हयाबाबत प्रस्ताव स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन रु. 5,74,95,079/— एवढया रक्कमेच्या कार्यादेश राशीस व कार्यादेश निर्गमित करण्याच्या सुचनेसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 343</u>:— नागपूर शहरातील सिमेंट कॉक्रीट रस्ते फेज—2 प्रकल्प राबविण्याकरीता या प्रकल्पा अंतर्गत समाविष्ट रस्त्यांच्या कामाच्या निविदा मागविण्यास्तव प्रतीरूप ( Model ) निविदा सुचना तथा निविदा अटी व शर्ती यास मंजूरी प्रदान करण्याचा तसेच मंजुर अटी व शर्ती यात निविदा प्रक्रिया मधील 'प्री बिड' मिटींग मध्ये उपस्थित होण्याऱ्या मुद्या नुसार काही बदल करावयाचे झाल्यास त्याबाबतचे अधिकार अधिक्षक अभियंता यांना देण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन खालील सुचनेसह प्रस्तावित विषयांस समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

1. निविदा प्रक्रिया मधील "प्री बिड" मिटींग मध्ये उपस्थित होणाऱ्या मुद्या नुसार काही बदल करावयाचे झाल्यास त्याबाबतचे अधिकार अधिक्षक अभियंता यांना देण्यात येते, परंतू बदल करण्यापूर्वी अध्यक्ष, स्थायी समिती यांना केलेले बदल अवगत करणे बंधनकारक राहील.
2. लघु निविदा काढण्यास एकमताने मंजूरी प्रदान करते.
3. प्रशासनाने संपूर्ण 22 पॅकेजेस ची प्रशासकीय मान्यता व निविदा मंजूरी एकत्रित मान्यते करिता स्थायी समितीकडे सादर करावी. स्थायी समितीची प्रशासकीय मान्यता प्राप्त होणार आहे या धारणेवर 22 पॅकेजेसची निविदा प्रक्रीया पूर्ण करावी. त्यामुळे या प्रस्तावाची

अंमलबजावणी जलद गतीने होइल असे स्थायी समितीचे मत आहे. यांस एकमताने ही स्थायी समिती मंजूरी प्रदान करते.

4. वरील निविदा प्रक्रीया होत असतांना एकाचवेळी विभागीय आयुक्तांकडे शासनाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे हा प्रस्ताव मान्यतेसाठी तातडीने पाठवावा व प्रस्तावास मंजूरी प्राप्त करुन घ्यावी. व त्याकरीता निविदा प्रक्रीया थांबवु नये. असेही ही स्थायी समिती निर्देश देते.

<u>ठराव क्रमांक 344</u>:— प्रभाग क्र. 45 ब अंतर्गत वाठोडा दहन घाटाचे सौंदर्यीकरण करण्याचे करण्यास्तव रू. 25,36,860/— रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करणे व पद क्र. A43501271705 अंतर्गत तरतूद उपलब्ध करून देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 345</u>:— प्रभाग क्र. 40 ब गांधीबाग प्रभागातील रिसालदार लेन येथील श्री. दिक्षीत यांच्या घरापासुन ते भंडारा अर्बन को. ऑप. बॅंके पर्यंत सिमेंट रोडचे बांधकाम करण्याचे कामास्तव प्राप्त 2 निविदांपैकी मे. संतोष आर खरपकर यांची प्राकलनीय दरांपेक्षा 8.28 प्रतिशत ने कमी दरांची रू. 73,23,348/— (अक्षरी त्र्याहत्तर लक्ष तेवीस हजार तिनशे अठ्ठेचाळीस रूपये) रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 346</u>:— प्रभाग क्र. 20 ब अंतर्गत भोसलेवाडी व लष्करीबाग येथे नाल्याची भिंतीचे बांधकाम करण्याचे कामास्तव तयार केलेल्या रु.49,99,994/— (अक्षरी एकोणपन्नास लक्ष नव्याण्णव हजार नऊशे चौऱ्यांनव रुपये) रकमेच्या प्राकलनास जुने पद क्र. 618 व नवीन पद क्र. A43901370812 अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 347</u>:— प्रभाग क्र. 4 अ अंतर्गत नयी बस्ती येथील इब्राहीम कुरेशी यांचे घरापासून ते जमील ड्रायव्हर व मक्का मस्जिद ते रोशन हाजीचे घरापर्यंत सिमेंट कॉंक्रिट रोडचे बांधकाम करण्याचे कामास्तव तयार केलेल्या रु. 54,08,835/— (अक्षरी चौपन लक्ष आठ हजार आठशे पस्तीस रुपये) रकमेच्या प्राकलनास जुने पद क्र. 681 व नवीन पद क्र. A22001330802 अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 348</u> :— मा. सदस्यांनी सादर केलेला खालील ठराव मा. अध्यक्ष यांनी दिलेल्या निर्देशानुसार अति.उपायुक्त यांनी स्थायी समितीच्या सभेमध्ये वाचून दाखविला व त्यास समितीने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**-: ठराव :-**

**आर्थिक वर्ष २०१५-१६ मध्ये अतिमुसळधार पावसामुळे शहरातील रस्त्यांची परिस्थिती अतिशय दयनिय झाली. तसेच रस्त्यांची अनेक प्रकरणे आयुक्तांनी सादर केलेल्या सुधारित अर्थसंकल्पात पुरेशी तरतूद उपलब्ध नसल्यामुळे निधी अभावी प्रलंबित राहीली होती. अशी सर्व प्रकरणे यावर्षी च्या अर्थसंकल्पातून पूर्ण करावयाची होती. परंतू स्थायी समितीने मंजूर केलेल्या अनेक प्रकरणातील कार्यादेश आर्थिक वर्ष २०१५-१६ मधून बांधील खर्चातून न देता नवीन प्रस्तावित कामांच्या पदाअंतर्गत तरतूद देण्यात आली. यामुळे रस्त्यांच्या पद क्र. अ२२००१३३०८०२ (शहरातील इतर रस्त्याचे डांबरीकरण सुस्थीती व दुरूस्ती करणे) मध्ये प्रस्तावित केलेल्या तरतूदीपेक्षा अधिक झालेली आहे. त्यामुळे अतिशय तातडीच्या व अत्यंत खराब रस्त्यांचे सुस्थिती व दुरुस्ती करणे आवश्यक असल्यामुळे तसेच नागपूर नगरीतील आकस्मिक विविध विकास कामे व इतर खालील स्पष्ट केलेल्या पदाअंतर्गत निधीची कमतरता असल्यामुळे ही स्थायी समिती खालील पदाअंतर्गत पुनःसमायोजन करण्याचे प्रस्तावित करीत आहे.**

**करिता या प्रस्तावास स्थायी समिती एकमताने मंजूरी प्रदान करते. तसेच महासभेची मंजूरी प्राप्त होईल या पुर्वधारणेवर खालील प्रमाणे कार्यवाही करण्यास एकमताने मंजूरी प्रदान करते. तसेच म.न.पा. महासभेची मंजूरीसाठी हा प्रस्ताव पाठविण्यास ही स्थायी समिती एकमताने मंजूरी प्रदान करते.**

**<u>स्थायी समिती द्वारे प्रस्तावित फेरबदल</u>**

| FUNCTION DISCRIPTION कार्यात्मक समुह | अर्थसंकल्पीय पद क्रमांक | विशदीकरणात्मक व्यय शिर्ष ( प्राथमिक व्यय घटक ) | प्राधिकृत विभाग | २०१५-२०१६ प्रस्तावित | एकूण |
|---|---|---|---|---|---|

| विवरण<br>गौण शिर्ष | | | | Illustrative Of Other<br>FUNCTION GROUP | | स्थायी समिति द्वारा सूचित | घट | वाढ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| Roads and Pavements & Others Civic Works<br>रस्ते व फरसबंदी आणि इतर नागरी विकास कार्य | A2 | 20013 | 30802 | शहरातील इतर रस्त्याचे डांबरीकरण सुस्थीती व दुरूस्ती करणे | P.W.D. | 3500.00 | 00.00 | 1500.00 | 5000.00 |
| Capital Work For Other civil Amenity<br>इतर नागरी सुखसोयी करीता भांडवली निर्माण कार्य व व्यय | A4 | 20013 | 74604 | नागपूर नगरी करीता आकस्मिक विविध विकास कामे (मा. अध्यक्ष, स्थायी समिती यांचे आदेशानुसार) | P.W.D. | 500.00 | 00.00 | 100.00 | 600.00 |
| City and Town Planning /Building Redulation<br>शहर नगर रचना/इमारत नियमन व नियमितीकरण व विकास योजना कार्यान्वन | A2 | 10018 | 20201 | ड्रॉईंगचे सामान खरेदी व किरकोळ खर्च | TOWN PLANNING | 1.00 | 00.00 | 5.00 | 6.00 |
| Accounts and Finance<br>लेखा व वित्त | A2 | 02004 | 41804 | बांधील महसुली खर्चाची तरतुद उपलब्ध करणे. (Committed Expenditure) | ACCOUNTS AND FINANCE | 2000.00 | 500.00 | 00.00 | 1500.00 |
| Roads and Pavements & Others Civic Works<br>रस्ते व फरसबंदी आणि इतर नागरी विकास कार्य | A2 | 20013 | 30801 | ए.र.वि.यो./क्रिप तसेच इतर मुख्य रस्त्यांची सुस्थिती व दुरुस्ती | P.W.D. | 1500.00 | 1000.00 | 00.00 | 500.00 |

| FUNCTION DISCRIPTION<br>कार्यात्मक समुह | अर्थसंकल्पीय पद क्रमांक | विशदीकरणात्मक व्यय शिर्ष ( प्राथमिक व्यय घटक ) | प्राधिकृत विभाग | २०१५-२०१६ प्रस्तावित | एकूण |
|---|---|---|---|---|---|

| विवरण<br>गौण शिर्ष | | | | Illustrative Of Other FUNCTION GROUP | | स्थायी समिती द्वारा सूचित | घट | वाढ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| Roads and Pavements & Others Civic Works<br>रस्ते व फरसबंदी आणि इतर नागरी विकास कार्य | A2 | 20014 | 30805 | **शहरातील रस्त्यावरील खड्डयाची सुस्थिती व दुरुस्ती करणे.** | HOTMIX | 1000.00 | 105.00 | 00.00 | 895.00 |
| | | | | **एकुण** | | 8501.00 | 1605.00 | 1605.00 | 8501.00 |

सुचक – हस्ता/– ॲड. संजयकुमार बालपांडे
अनुमोदक – हस्ता/– श्री. किशोर गजभिये
हस्ता/– श्री. संदीप सहारे
हस्ता/– सौ. निता ठाकरे
हस्ता/– श्री. दिपक पटेल.

<u>ठराव क्रमांक 349</u> :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

जयंत दांडेगावकर
अति. उपायुक्त
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर